Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

### मार्च / एप्रिल 2021 उन्हाळी सत्र परीक्षा अर्ज भरण्यासाठी अधिविभाग/महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्था यांचे साठी महत्वाच्या सूचना

1. दिनांक 5 जुलै 2021 पासून महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये परीक्षा अर्ज संगणक प्रणाली द्वारे उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा अर्ज भरून घेताना स्थानिक प्रशासनाने तसेच शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार योग्य ती खबरदारी घेण्याची आहे.
2. परीक्षा अर्ज भरून घेताना एकावेळी 10 पेक्षा अधिक विद्यार्थी एकत्र येणार नाहीत याची दक्षता घ्यावी व त्यासाठी दिवस निहाय, अभ्यासक्रम निहाय, भाग निहाय, सत्र निहाय, सकाळ / दुपार वेळेचे सूक्ष्म स्तरावर नियोजन करावे.
3. परीक्षा अर्ज तपासण्यासाठी विद्यार्थ्यांना वर्गखोल्या उपलब्ध करून द्याव्यात जेणेकरून सामाजिक अंतर राखले जाईल. अर्जातील विषय/कोड कसे निवडावेत यांचे इलेक्ट्रॉनिक मीडियाचा वापर करून मार्गदर्शन करावे किंवा वर्ग खोल्यांमधून नमुना परीक्षा अर्ज डिस्प्ले करून अर्ज अचूक भरावेत.
4. शक्य झाल्यास विद्यार्थ्यांना महाविद्यालयात न येता परीक्षा अर्ज भरता येतील यादृष्टीने इलेक्ट्रॉनिक मीडियाचा वापर करावा. तसेच परीक्षा फी भरण्यासाठी महाविद्यालयाकडे ऑनलाइन पेमेंट गेटवे सुविधा उपलब्ध असेल तर त्याचा वापर करावा, जेणेकरून परीक्षा फी भरण्यासाठी ज्यादा संख्येने विद्यार्थी एकत्र येणार नाहीत. यासाठी सर्व त्या आवश्यक सूचना विद्यार्थ्यांना व्हाट्सअप ग्रुप च्या द्वारे देण्यात याव्यात.
5. मार्च / एप्रिल 2021 उन्हाळी सत्रातील सर्व परीक्षा या ऑनलाइन पद्धतीने होणार असल्याने यापूर्वी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालय स्तरावर विद्यापीठ संगणक प्रणाली मधील स्टुडन्ट प्रोफाईल मध्येच मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अद्यावत करून घेण्यात यावेत. तसेच यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने परीक्षा दिली असून अशा विद्यार्थ्यांचे यापूर्वी अद्यावत करण्यात आलेल्या मोबाईल नंबर व ई-मेल आयडीवर ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यात येणार आहे.
6. जस-जसे परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांकडून प्राप्त होतील तस तसे ज्या त्या दिवशी विद्यापीठ संगणक प्रणालीत तपासून अप्रूव करावेत म्हणजेच शेवटच्या दिवशी सर्व्हरबाबत तांत्रिक अडचणी उद्भवनार नाहीत.
7. ऑनलाइन पद्धतीने परीक्षा होणार असल्याने परीक्षा अर्जामध्ये विषयांची चूक विद्यार्थ्यांकडून होणार नाही यादृष्टीने परीक्षा अर्ज महाविद्यालय स्तरावर तपासण्यात यावेत.
8. डबल ग्रॅज्युएशन व इम्प्रोवमेंटचे परीक्षा अर्ज संगणक प्रणालीतून भरता येत नसतील तर असे परीक्षा अर्ज मॅन्युअल पद्धतीने भरून 20 जुलै, 2021 पूर्वी विद्यापीठास पोहोच करावेत जेणेकरून सदर विद्यार्थ्यांची संगणक प्रणालीत नोंद करता येईल.
9. महाविद्यालयाने ज्या विद्यार्थ्यांचे पुनर्परीक्षेसाठी परीक्षा अर्ज भरलेले आहेत अशा विद्यार्थ्यांचे सुधारित निकाल जाहीर झालेनंतर परीक्षा अर्ज अप्रूव्ह करण्यात यावेत.
10. ज्या महाविद्यालयात नियमित विद्यार्थी आहेत (उदा : कला, वाणिज्य आणि शास्त्र) अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज सेमिस्टर ते सीबीएस या अभ्यासक्रमानुसार भरणेत यावेत. ( उदा : कोर्स कोड ३८८ आणि ७७८ )

जा . क्र. /शिवाजी वि./परीक्षा /347
दिनांक :- 17 JUL 2021

प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ